आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार दिनांक १४ जून २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. योग ही भारताची जागतिक कल्याणासाठीची देणगी असल्याचं ग्लोबल योगा समिट-योगा कनेक्ट कार्यक्रमात आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांचं प्रतिपादन.

2. पाच परदेशी विद्यापीठांची संकुलं महाराष्ट्रात उभारण्यासाठीची इरादापत्रं आज प्रदान.

3. नीट २०२५ चा निकाल जाहीर/ राज्यातल्या कृशांग जोशीला तिसरा क्रमांक.

4. अहमदाबाद विमान अपघातासारखे प्रकार रोखण्यासाठी उपाय सुचवण्याकरता उच्चस्तरीय समितीची स्थापना/ अपघातातल्या मृतांची संख्या २५४ वर.

<u>'आंतरराष्ट्रीय योग कनेक्ट-२०२५'</u>

योग ही भारताची जागतिक कल्याणासाठीची देणगी असल्याचं प्रतिपादन आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. नवी दिल्लीत आज आयोजित केलेल्या ग्लोबल योगा समिट-योगा कनेक्ट कार्यक्रमात ते बोलत होते. धर्म, लिंग, भाषेच्या सीमा ओलांडून योग हा सर्वांसाठी उपलब्ध असल्याचं जाधव यांनी सांगितलं. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आणि गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांसाठी योग उपयुक्त असल्याचं त्यांनी सांगितलं. सरकारी संस्थेच्या पाहणीनुसार, गेल्या दहा वर्षांत ३३ टक्के नागरिक आंतरराष्ट्रीय योगा दिनात सहभागी झाल्याचं आयुष मंत्री जाधव यांनी नमूद केलं.योगबाबत विविध लाभ विशद करताना प्रतापराव जाधव म्हणाले कि .......

*<u>योग डायबिटीज के प्रबंधन, हृदय स्वास्थ्य में सुधार और यहाँ तक कि कैंसर रोगियों और बुजुर्गों को उनकी बीमारी से बेहतर तरीके से निपटने में मददगार है। योग सिर्फ आध्यात्मिक और ध्यान का ही अभ्यास नहीं है बल्कि यह स्वास्थ्य क्षेत्र में रोजगार के अपार अवसर भी प्रदान करता है।</u>*

योग ही भारतानं जगासाठी दिलेली अमुल्य भेट असल्याचं प्रतिपादन यावेळी केंद्रीय मंत्री शेखावत यांनी केलं. देश विदेशातील सुमारे एक हजार अभ्यासक या परिषदेत सहभाग घेणार आहेत. जगभरातल्या आंतरराष्ट्रीय योग संस्थांचे प्रतिनिधी दूरस्थ पद्धतीनं परिषदेत उपस्थित राहतील.

## धर्मेंद्र प्रधान

संपूर्ण जग आज भारताकडे फक्त एक जागा म्हणून नाही, तर ज्ञान आणि माहितीच्या क्षेत्रातला भागीदार म्हणून बघत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज केलं. पाच परदेशी विद्यापीठांची संकुलं महाराष्ट्रात उभारण्यासाठीची इरादापत्रं या विद्यापीठांना आज देण्यात आली, या कार्यक्रमात ते मुंबईत बोलत होते. विकसित भारताच्या प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा असून शिक्षणामुळेच देशाचं भविष्य सुरक्षित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना आपल्या देशातच जागतिक दर्जाचं शिक्षण परवडण्याजोग्या शुल्कात मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. परदेशी शिक्षणसंस्थांसाठी भारताची दारं उघडण्यात नवीन शैक्षणिक धोरणानं महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. विविध परदेशी विद्यापीठांची संकुलं असलेली एक पूर्ण नवी एज्युसिटी भारतात, विशेषतः नवी मुंबईत उभारण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.या कार्यक्रमात इंग्लंडमधली युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतलं इलिनॉय टेक आणि इटलीचं आयईडी स्कूल ऑफ डिझाइन या संस्थांना त्यांची संकुलं राज्यात सुरू करण्यासाठीची इरादापत्रं देण्यात आली. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, या पाचही विद्यापीठांचे प्रतिनिधी, सिडको आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकारी आणि इतरही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - दौरा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून पाच दिवस सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांच्या निमंत्रणावरून ते उद्या सायप्रसला भेट देतील. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडोलाइड्स यांच्याशी चर्चा करतील, तसंच लिमासोल इथं उद्योगपतींशी संवाद साधतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून प्रधानमंत्री मोदी १६ जून रोजी कॅनडाच्या कानानास्किस इथं जी-७ परिषदेत सहभागी होणार आहेत. इथं ते जी-७ देशांच्या नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा करतील, तसंच परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध द्विपक्षीय बैठकाही घेतील. शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी १८ जून रोजी क्रोएशियाला भेट देतील. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. या दौऱ्यादरम्यान ते क्रोएशियाचे

प्रधानमंत्री आंद्रेज प्लेनकोविच यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील, तसंच क्रोएशियाचे राष्ट्राध्यक्ष झोरान मिलानोविच यांचीही ते भेट घेणार आहेत.

<u>दुरसंचार विभाग</u>

दुरसंचार विभागानं मोबाईलच्या सिमकार्ड विषयक नियमांत आता बदल केला आहे. यानुसार मोबाईलच्या प्रीपेड प्रकारातून पोस्टपेड किंवा पोस्टपेडमधून प्रिपेड प्रकारात योजना रुपांतरीत करण्याच्या प्रक्रीयेचा कालावधी तीस दिवस इतका कमी करण्यात आला आहे. म्हणजेच वापरत असलेली सेवा योजना काही कारणास्तव बदलायची असल्यास पुन्हा तीस दिवसात त्यात बदल करता येईल. याआधी प्रीपेड-पोस्टपेड बदलासाठी ९० दिवसांचा काळ लागत होता.

<u>रक्तदान दिवस</u>

आज जागतिक रक्तदान दिवस साजरा होत आहे. २००४ या वर्षापासून हा दिवस साजरा होतो. जागतिक आरोग्य संघटना -डब्लुएचओ, रेड क्रॉस संघटना, आंतरराष्ट्रीय रक्तदाते संघटना यांच्या पुढाकारातून जागतिक स्तरावर या दिनाच्या अनुषंगानं जनजागृतीचं काम करण्यात येतं. 'रक्तदान करुया, नवी आशा निर्माण करुया: आपण सोबतीनं जीव वाचवूया' अशा संकल्पनेनुसार, यंदा रक्तदानाचं महत्व विशद केलं जात असून ठिकठिकाणी आज रक्तदान शिबिर घेतली जात आहेत.

<u>नीट २०२५</u>

वैद्यकीय शिक्षण प्रवेश परीक्षा नीट २०२५ चा निकाल जाहीर झाला असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीने प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियाने दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या ५५२ आणि देशाबाहेरच्या १४ शहरांमध्ये ४ मे रोजी आयोजित केलेल्या या परीक्षेला २२ लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

<u>अहमदाबाद विमान अपघात</u>

अहमदाबाद विमान अपघातानंतर केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेल्या पोस्टमधे म्हटलंय की ही समिती अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नयेत याकरता वापरण्याच्या सर्वसामान्य कार्यपद्धतीचा आढावा घेऊन ही समिती मार्गदर्शक सूचना जारी करील. या प्रकरणी चौकशी करणाऱ्या इतर यंत्रणांचं काम सुरुच राहणार असून ही समिती केवळ अपघात प्रतिबंधासाठी शिफारशी करील. दरम्यान, अपघातग्रस्त विमानाचा फ्लाइट डेटा रेकॉर्डर

अर्थात ब्लॅक बॉक्स काल सापडला असून याद्वारे अपघातापूर्वीच्या परिस्थितीवर प्रकाश पडेल अशी अपेक्षा आहे. अपघाताच्या पार्श्वभूमीवर Genx इंजिन असलेल्या बोइंग ७८७ विमानांची अतिरीक्त सुरक्षा चाचणी करण्याचे निर्देश विमान वाहतूक महासंचालकांनी एअर इंडियाला दिले आहेत.

५ प्रादेशिक विभागांची निर्मिती

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. या निर्णयानुसार मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे ५ प्रादेशिक विभाग करण्यात आले असून, प्रत्येक प्रादेशिक विभाग अंतर्गत कार्यरत विभाग व मुख्यालय निश्चित करण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचे परिपत्रक नुकतेच एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी काढले असून पुढील काही दिवसात हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करित आहेत.

पार्किंगची सोय

शहरात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नागरिकांना शिस्तबद्ध पार्किंगची सवय लावण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर 'स्ट्रीट पार्किंग' साठी ५१ जागा निश्चित करून पार्किंगची जागा अधोरेखित व्हावी, याकरिता त्यावर पांढऱ्या रंगाचा लहान पट्टी रेखांकित करण्यात आल्या आहेत. मनपाद्वारे राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शहरातील ७५ प्रमुख रस्त्यांवर 'स्ट्रीट पार्किंग'साठी सर्वेक्षण करण्यात आले. यातील ५१जागा पार्किंगसाठी सुनिश्चित करण्यात आल्या आहेत. यावर जवळपास १३ हजार ५०० दुचाकी वाहन आणि ४ हजार चारचाकी वाहनांना पार्क करण्यासाची सोय उपलब्ध होणार आहे.

हवामान

आगामी काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर, यवतमाळ, वाशीम आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये काही वादळासह विजांचा कडकडाट आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, अकोला जिल्ह्यात काल झालेल्या वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसानं शेत आणि फळपिकांचं तसंच घरांचं मोठं नुकसान झालं. अकोट आणि पातूर तालुक्यातील ५८ गावांतील पपई, संत्रा, लिंबू आणि केळी या फळपिकांना पावसाचा तडाखा बसला तर फळपिकांचे १ हजार ६०७ हेक्टर क्षेत्र बाधित झालं आहे तसंच अकोट आणि मूर्तिजापूर तालुक्यातील ५७ घरांची पडझड झाली असल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हा नैसर्गिक आपत्ती विभागाला प्राप्त झाला आहे.

*****